**प्रेसनोट** **दिनांक ०३/०४/२०१९**

## मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वाढत्या उन्हाळयात सामान्य नागरिकांची तहान भागविण्यासाठी थंडगार पाणपोई चालु केले बाबत.

वाढलेल्या उन्हाच्या तापमानामध्ये सामान्य नागरिकांना मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे हद्दीत थंडगार पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मार्केटयार्ड पोलीस स्टेशनच्या हद्दीत ठिकठिकाणी पाणपोई करण्याचे नियोजन असुन त्या दृष्टीकोनातुन दि.०३/०४/२०१९ रोजी दुपारी १३/०० वा.आशिया खंडातील सर्वात मोठी धान्य बाजारपेठ असलेल्या मार्केटयार्ड मध्ये गेट नं ३ समोरील मे.चेनसुखलाल माणीकचंद ट्रेडर्स ह्या दुकानाबाहेर थंडगार पाण्याची पाणपोई मा. सी.डी.देशमुख मुख्य प्रशासक कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केटयार्ड पुणे यांच्या शुभहस्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संभाजी एस.निंबाळकर यांच्या उपस्थितीत उद्घाटन करुन सामान्य नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे.

या कार्यक्रमासाठी मार्केटयार्ड धान्य बाजार परिसरातील नामवंत व्यापारी श्री पोपटलाल ओसवाल,फुल बाजार आडते असोसिएशनचे अध्यक्ष श्री आप्पासाहेब गायकवाड,श्री सुभाष लोढा ,श्री शिवाजी केंगार, व इतर कार्यकर्ते असे एकुण ४० ते ५० लोकांचा जनसमुदाय हजर होता.अशा प्रकारे मार्केटयार्ड पोलीस स्टेशनच्या हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी पाणपोई बसविण्यात येणार आहेत.

